दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक
# वादळ वार्ता
vadalvartanews@gmail.com
संपादक : अजय भांगे
https://epaper.vadalvarta.com
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | सोमवार दि.१ डिसेंबर २०२५ | 9422660077 | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष ३ रे | अंक १०० | पाने ४ | किंमत ४ रुपये
Beed (Mahmar) Daily Marathi | Monday 1 December 2025 | 9422660077 | RNI-MAHMAR / 2023 / 87555 | Year - 3rd | Issue 100 | Pages 4 | Rate 4 Rs

## पुणे खासदार क्रीडा महोत्सवाचा समारोप

**पुणे** –खासदार क्रीडा महोत्सवाचा गुरुवारी गणेश कला क्रीडा रंगमंच येथे समारोप झाला. या महोत्सवात ४४ हजार खेळाडूंनी सहभाग घेतला. समारोप प्रसंगी अभिनेता अक्षय कुमार उपस्थित होते. 'उत्तम आरोग्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे,' असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.अक्षय कुमार म्हणाले की, सध्याची लहान मुले मोबाइल गेममध्ये रमलेली दिसतात, त्यामुळे मैदानावर येणाऱ्या मुलांची संख्या कमी झाली आहे. अशा परिस्थितीत पुण्यातून ४४ हजार खेळाडू मैदानात उतरतात, ही एक मोठी आणि कौतुकास्पद बाब आहे. खेळांमुळेच उत्तम आरोग्य घडते, असेही त्यांनी अधोरेखित केले.

# तिजोरी जनतेची, माझ्यापेक्षा जास्त अधिकार मुख्यमंत्र्यांकडे

## 'तिजोरीच्या चाव्या माझ्याकडे' या वक्तव्यावरून अजित पवारांची सारवासारव

पुणे (वृत्तसंस्था)–माझ्या हातात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत, या विधानावरून महायुतीत नाराजीचे सूर उमटल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आता सारवासारव केली आहे. ते विधान मी ओघात बोललो होतो. तिजोरी माझ्या किंवा कुणाच्या बापाची नाही, ती जनतेची आहे. तसेच माझ्यापेक्षा जास्त अधिकार हे मुख्यमंत्र्यांनाच आहेत, असे स्पष्टीकरण अजित पवार यांनी दिले.राज्यात नगरपालिका आणि नगर परिषदेच्या निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात आला आहे. अनेक ठिकाणी महायुतीमधील पक्ष एकमेकांसमोर उभे ठाकले आहेत. त्यामुळे राजकारण चांगलेच तापले आहे. यातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका सभेत बोलताना तुम्ही राष्ट्रवादीच्या उमेदवारांना मतदान करा, तुमच्या भागाला निधी कमी पडू देणार नाही. तुमच्या हातात मत आहे, तर माझ्या हातात निधी आहे. असे वक्तव्य केले होते. त्यांच्या या वक्तव्यानंतर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनीही अजित पवारांच्या हातात राज्याच्या तिजोरीच्या चाव्या आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीला मतदान केल्यास निधी मिळेल, असे म्हटले होते. यावरून भाजप नेत्यांनी अजित पवार यांच्यावर निशाणा साधला होता. आता अजित पवारांनी आपल्या वक्तव्यावर सारवासारव केली आहे.



भोर नगरपालिका निवडणूक प्रचारानिमित्त उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नुकतीच जाहीर सभा पडली. या सभेत बोलताना त्यांनी तिजोरीच्या चाव्यावरील विधानावर स्पष्टीकरण दिले. मी परवा बोलताना म्हणालो होतो की चाव्या माझ्याकडे आहेत, पण तो केवळ बोलण्याचा एक भाग होता. लगेच काहींनी (भाजप नेत्यांनी) आठवण करून दिली की चावी तुमच्याकडे असली तरी तिजोरी आमच्या खोलीत आहे. अरे, पण कोणाच्याही खोलीत तिजोरी असू द्या, तिजोरी ही जनतेची आहे. ती माझ्या किंवा इतर कुणाच्या बापाची नाही, हे सत्य आहे, असे अजित पवार म्हणाले.यावेळी अजित पवारांनी आपल्या उमेदवारांच्या चारित्र्यावर भर देत विरोधकांवर, विशेषतः काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे आणि स्थानिक विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. माझ्या पक्षाच्या उमेदवारांवर नजर टाका. रामचंद्र आवारे यांच्यासारख्या स्वच्छ प्रतिमेच्या व्यक्तीला मी नगराध्यक्षपदाची उमेदवारी दिली आहे. मी 'दोन नंबर'चे धंदे करणाऱ्यांना उमेदवार केलेले नाही. इतर पक्षांनी कुणाला उमेदवारी दिली आहे, ते तुम्हीच तपासा, असे आवाहन त्यांनी मतदारांना केले.पुणे जिल्हा बँकेच्या कारभारावरून त्यांनी संग्राम थोपटे यांना लक्ष्य केले. मी बेरजेचे राजकारण करतो, कामात मोकळीक देतो. पण तुम्ही ज्यांना जिल्हा बँकेवर निवडून दिले, ते संचालक मंडळाच्या मिटिंगला किती वेळा हजर असतात? अशी विचारणा अजित पवारांनी उपस्थितांना केली.

### माझ्यापेक्षा जास्त अधिकार मुख्यमंत्र्यांकडे

**महायुतीमध्ये तिजोरीच्या अधिकारांवरून सुरू असलेल्या चर्चांना पूर्णविराम देण्याचा प्रयत्न करताना अजित पवार म्हणाले, माझ्याकडे अर्थमंत्री म्हणून अधिकार आहेतच, त्याआधारे विकासाला मदत करणे हे माझे कर्तव्य आहे. पण, माझ्यापेक्षा जास्त अधिकार नक्कीच मुख्यमंत्र्यांकडे आहेत, हे मी मान्य करतो.**

# सहकारी साखर कारखान्यांनी ऊसाला प्रति टन ४ हजार रुपये भाव जाहीर करावा-प्रा.बबनराव आंधळे

दैनिक वादळ वार्ता
**बीड। प्रतिनिधी**



वाढती महागाई त्याचबरोबर इतरही शेतीसाठी लागणारा खर्च यामुळे उसाचा भावही वाढला पाहिजे अशी मागणी बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केली आहे शेतकऱ्यांना आपल्या ऊसाला भाव जोपर्यंत शेतकरी स्वतःसाठी स्वतः रस्त्यावर उतरत नाही तोपर्यंत कुठेही ठोस भूमिका कोणताही कारखाना शासन प्रशासन घेणार नाही कारखानदाराची कुठपर्यंत वाहवा करायची आणि कारखानदाराचे लाडही शासनाने केली नाही पाहिजेत उसापासून विविध उपपदार्थ तयार होतात कारखानदारांना ऊस गाळप करताना चांगला फायदा होतो तरीदेखील कारखानदारांना शेतकऱ्यांना योग्य भाव देत देता येत नाही साखर ४००० रुपयापेक्षा जास्त विक्री होते आणि ऊसाला तीन हजाराच्या आतच भाव दिला जातो म्हणजे किती तफावत आहे मराठवाड्यातला शेतकरी आधीच आर्थिक दृष्ट्या कमकुवत झालेला आहे कारण मराठवाड्यामध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे ऊसच नाही तर मराठवाड्यात प्रत्येक पीक धोक्यात आले होते त्यामुळे शेतकरी अडचणीत सापडलेला आहे मराठवाड्यात तितके उसाचे क्षेत्र नाही पण जे काही ऊस उत्पादक शेतकरी आहेत निदान त्यांना ऊस लावायला तरी परवडायला

पाहिजे त्यासाठी मराठवाड्यात जितके सहकारी आणि खाजगी साखर कारखाने आहेत त्या कारखान्यांनी ४००० रुपये भाव देण्याचा निर्णय घेतला पाहिजे हे तर नक्कीच सत्य आहे कायदा शेतकऱ्यांना होऊ शकतो ज्या प्रमाणात कापूस सोयाबीन या पिकाला भाव नाही त्याच प्रमाणात ऊसाला देखील योग्य भाव मिळत नसल्यामुळे ऊस उत्पादक शेतकरी देखील कर्जाच्या विळख्यात सापडलाय याला कर्जमुक्त करायचे असेल तर ऊसाला चांगला भाव मिळाला पाहिजे पहिल्यांदा ऊस लावण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो आणि त्यानंतर उसातून जे काही उत्पन्न निघेल त्यावर समाधान मानावे लागते आज वातावरण बदलामुळे उसाचे उत्पादन देखील कमी झालेलं आहे उसाचे उत्पादन एकरी मराठवाड्यात ३० ते ४० टनापर्यंत निघत आहे इतर ठिकाणी जास्त

उत्पादन निघत असेल परंतु मराठवाड्यात उत्पादन कमी निघत आहे आणि उत्पादन कमी निघाल्यामुळे ऊस खर्चाला परवडत नाही कारखानदार ही योग्य भाव देत नाहीत त्यामुळे ऊस उत्पादक देखील अडचणीत सापडले आहेत माजलगाव येथील शेतकऱ्यांनी जी भूमिका घेतली ती भूमिका पूर्ण मराठवाड्यातील शेतकऱ्यांनी घेण्याची गरज आहे राज्यातले सर्व साखर कारखाने बंद राहू शकतात एकदा का कारखाने बंद राहिले की शासनाला आणि कारखानदारांना जाग येऊ शकते शासनाला जाग आणण्यासाठी मराठवाड्यातीलच नाहीतर महाराष्ट्रातील सर्व शेतकऱ्यांनी एकजूट करून उसाच्या भावासाठी ठोस पाऊल उचलणे आवश्यक आहे असे प्रतिपादन एका प्रसिद्धी पत्रकार द्वारे बीड जिल्हा सहकार बोर्डाचे संचालक प्राध्यापक बबनराव आंधळे यांनी केले आहे .

# जिवाचीवाडी येथे पोखरा योजनेत गैरप्रकार, सचिवाच्या मनमानीला पायबंद घालण्यासाठी जिल्हाधिकारी यांना निवेदन–सुभाष सारुक



दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील जीवाचीवाडी गावातील पोखरा योजनेत अनेक गैरप्रकार होत असल्याचा गंभीर आरोप करत गावा तील सुभाष सखाराम सारुक यांनी बीड जिल्हाधिकारी कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली आहे. संबंधित योजनेतील निधीचे नियोजन चुकीचे होत असून प्रत्यक्षात कोणतीही कामे न करता कागदोपत्री खर्च दाखवला जात असल्याचे त्यांनी तक्रारीत म्हटले आहे.तक्रारदार सुभाष सारुक यांनी आरोप केला की,पोखरा योजनेंतर्गत कोणताही ग्रामसभा निर्णय न घेता गावाच्या सचिवांनी स्वतःच कामांचे आदेश दिले.यामुळे शेतकऱ्यांची दिशाभूल करण्यात आली आहे. अनेक वेळा ग्रामसभेची मागणी करूनही सचिवांनी ग्रामसभा न घेता मनमानी कारभार केल्याचेही त्यांनी नमूद केले आहे.

या प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित अधिकारी व जबाबदार व्यक्तींवर कठोर कारवाई करण्यात यावी,अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.अन्यथा उच्चस्तरीय कार्यालयात तक्रार दाखल करण्याचा इशारा सुभाष सारुक यांनी दिला आहे.

# कर्जबाजारीपणा,पिक नुकसान आणि नैराश्याचा कडवा शेवट, धोत्रा येथील तरुण शेतकऱ्याचा उपचारा दरम्यान मृत्यू

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील धोत्रा गावात एक हृदयद्रावक घटना घडली असून, सततच्या पिकनुकसानीने आणि वाढत्या कर्जाच्या ताणाने त्रस्त होत अल्प भूधारक तरुण शेतकरी संतोष (बापू )शाहूराव दोडके वय ३६ यांनी अखेर जीव देण्याचा मार्ग स्वीकारला.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या आर्थिक विवंचनेचे तीव्र चित्र पुन्हा एकदा समोर आले आहे.



गेल्या काही वर्षांपासून हवामानातील अनिश्चितता अतिवृष्टी व पावसाच्या असमान पर्जन्यामुळे माफक पिक येणे ही संतोष दोडके यांच्या शेताची कायमस्वरूपी समस्या बनली होती. यामुळे शेतीवरील खर्च तर वाढतच होता,उलट उत्पन्न मात्र कमी होत गेल्याने त्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे ढासळले होते.यामध्येच महाराष्ट्र ग्रामीण बँकेकडून घेतलेले कर्ज कशाने फेडावे, घरखर्च कसा भागवावा, पुढील हंगामासाठी तयारी कशी करावी याबाबतच्या चिंता वाढतच चालल्या होत्या.या सलगतणावातून आणि विवंचनेतून बाहेर पडण्याचा कोणताही मार्ग न सापडल्याने संतोष दोडके यांनी दिनांक २७ रोजी गुरुवारी विषारी औषध प्राशन केल्याची घटना उघडकीस आली. कुटुंबीय व ग्रामस्थांनी त्यांना तातडीने बीड येथील एका खाजगी रुग्णालयात दाखल केले. उपचार सुरू असतानाच त्यांची प्रकृती सतत खालावत गेली आणि अखेर दिनांक २९ नोव्हेंबर रोजी शनिवारी त्यांनी अखेरचा श्वास घेतला.संतोष दोडके हे प्रेमळ मनमिळावू शांत स्वभावाचे होते.त्यांच्या निधनामुळे धोत्रा गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी व तीन लहान मुली असा परिवार असून,कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे.गावातील शेतकरी बांधवांनी या घटनेवर हळहळ व्यक्त केली असून,शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाने गांभीर्याने पाहण्याची मागणी केली आहे.या घटनेने पुन्हा एकदा शेती व्यवसायातील अस्थिरता, कर्जबाजारीपणा आणि मानसिक तणाव या गंभीर मुद्द्यांना अधोरेखित केले आहे.

# बीड जिल्हा वकील संघ महिला प्रतिनिधी ॲड.मनीषा कुपकर पाटील यांची उप मुख्यमंत्री पवार यांच्या समोर ठोस मांडणी

दैनिक वादळ वार्ता
**बीड। प्रतिनिधी**

बीड नगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ पार्श्वभूमीवर, हॉटेल ग्रँड यशोदा,बार्शी रोड येथे राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना,शिवसंग्राम व समाजवादी पक्षांच्या युती तर्फे सुसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस महाराष्ट्राचे उप मुख्यमंत्री व बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार हे उपस्थित होते.शिवसंग्राम पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायक रावजी मेटे तसेच शिवसेनेचे नेते अनिलजी जगताप,बळीराम गवते शिवसंग्रामचे मराठवाडा प्रमुखअनिल घुमरे, शहराध्यक्ष शिवसंग्राम सुहास पाटील तसेच मनोज जाधव शहरातील डॉक्टर,वकील,प्राध्यापक, व्यापारी अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी या संवाद मेळाव्यात सहभाग घेतला.या प्रसंगी बीड जिल्हा वकील संघाच्या महिला प्रतिनिधी आणि शिवसंग्राम महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा ॲड.मनीषाताई कुपकर - पाटील यांनी बीड न्याय व्यवस्थेशी संबंधित काही महत्त्वपूर्ण प्रश्न थेट उप मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिले.ही



कोणतीही राजकीय सभा नसून,बीड च्या सर्वांगीण विकासा साठी व न्यायव्यवस्थेला भेडसावणाऱ्या अडचणी मांडण्याची संधी आहे, असे त्या म्हणाल्या.ॲड.मनीषाताई कुपकर- पाटील यांनी सर्वप्रथम नवीन बीड न्यायालय इमारतीसमोरील नॅशनल हायवेवरील दुभाजकाचा प्रश्न उपस्थित केला. न्यायालयाकडे थेट रस्ता नसल्यामुळे नागरिकांना दीड किलोमीटर फेरी मारून यावे लागत असल्याने मोठी गैरसोय निर्माण होत असल्याचे त्यांनी नमूद केले. न्यायालयात रोज ग्रामीण भागातील नागरिक येतात फेरी मारून येताना अपघाताचे प्रमाणही वाढले आहे.यावर तात्काळ उपाययोजना व्हावी अशी त्यांची मागणी होती.यानंतर त्यांनी नवीन वकिलांना किमान दोन वर्ष मानधन देण्याची मागणी केली. लाडकी बहीण योजने प्रमाणेच वकिली क्षेत्रात नवीन येणाऱ्या तरुणांना व्यवस्थित अभ्यास करता यावा,चांगली प्रॅक्टिस उभी करता यावी म्हणून त्यांना आर्थिक आधार योजना मिळावी असेही त्या म्हणाल्या.तसेच बीड जिल्हा न्यायालयात सुसज्ज महिला वकील कक्षाची निर्मितीकरण्याची मागणी त्यांनी केली. दररोज न्यायालयात अनेक महिला वकील कार्यरत असतात त्यांच्या सुरक्षिततेसाठी,सोयी सुविधांसाठी स्वतंत्र व सुसज्ज महिला कक्ष आवश्यक आहे असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले.

शिवसंग्राम महिला आघाडी जिल्हाध्यक्षा म्हणून बोलताना अड. मनिषाताई कुपकर–पाटील यांनी शिवसंग्रामचे संस्थापक लोकनेते विनायकराव मेटे यांची आठवण करून दिली. साहेबांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला प्राधान्य दिले.मराठाआरक्षणासाठीलढतांना वीरमरण प्राप्त केलेल्या साहेबांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी आम्ही अजितदादांसोबत खंबीर आहोत असे त्या भावनिक भाषणात म्हणाल्या.बीडचा बिहार नव्हे,तर बीडची बारामती व्हावी एवढीच अपेक्षा आहे असेही त्यांनी आवर्जून नमूद केले. या सुसंवाद बैठकीस उपमुख्यमंत्री अजित दादा पवार,आमदार विजयसिंह पंडित,शिवसेना जिल्हा प्रमुख अनिलदादा जगताप,ॲड.बाळासाहेब कोल्हे,प्रभारी अध्यक्ष ॲड.रघुराज देशमुख, सचिव ॲड.सुभाष काळे, सहसचिव ॲड.धीरज कांबळे,ॲड.योगेश चिकेकडे,ॲड.सय्यद अजीम यांच्यासह बीड जिल्ह्यातील अनेक वकील बांधव,डॉक्टर, प्राध्यापक,सीए,व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

संपादकीय

# वैदर्भियांचे लक्ष वेधून घेणारे दोन कार्यक्रम

महाराष्ट्रात सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांचा माहोल असताना नागपुरात मात्र दोन इव्हेंट्स चांगलेच गाजलेले आहेत. त्यातील एक केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून उभारले गेलेले ॲग्रो व्हिजन कृषी प्रदर्शन आणि दुसरा इव्हेंट म्हणजे नॅशनल बुक ट्रस्टतर्फे आयोजित नागपूर उत्सव पुस्तक महोत्सव हे पुस्तकांचे प्रदर्शन. विशेष म्हणजे ही दोन्ही प्रदर्शने फक्त प्रदर्शनी नसून तिथे त्या त्या विषयातील भाषणांचा देखील आनंद नागरिकांना मिळतो आहे.

नितीन गडकरी हे महाराष्ट्रातील एक कल्पक नेतृत्व म्हणून ओळखले जाते. १९९५ मध्ये गडकरी राज्य मंत्रिमंडळात मंत्री झाले. तेव्हापासून विदर्भातील शेतकऱ्यांची दुरवस्था ते बघत होते. १९९९ मध्ये ते विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते झाले. तिथे त्यांनी या समस्येचा अधिक खोलात जाऊन अभ्यास केला. शेतकऱ्यांसाठी काहीतरी करायला हवे या विचारातून त्यांनी २००७-०८ या काळात नागपुरात ॲग्रो व्हिजन या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करायला सुरुवात केली. त्यात देशभरातील कृषीविषयक संशोधन संस्था आणि कृषी उद्योगांचे स्टॉल्स लावले जात होते आणि त्याचबरोबर प्रदर्शनीच्या काळात दिवसभर विविध विषयांवर कृषी विषयक तज्ज्ञांची अभ्यासपूर्ण भाषणे असणाऱ्या कार्यशाळा देखील शेतकऱ्यांसाठी आयोजित केल्या जात होत्या. त्याला शेतकऱ्यांकडून दरवर्षी वाढताच प्रतिसाद मिळत होता. कोरोना काळातील दोन वर्षे सोडता सातत्याने दरवर्षी हे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. यंदा प्रदर्शनाचे सोळावे वर्षं आहे. सुरुवातीला हे प्रदर्शन रेशीमबाग मैदानावर आयोजित केले जात होते. आता ते नागपूरला अधिकच नजीकच्या दाभा परिसरात आयोजित केले जाते. यंदा या ग्रो व्हिजन प्रदर्शनाचे आयोजन २१ नोव्हेंबर ते २४ नोव्हेंबर या दरम्यान करण्यात आले होते. २१ नोव्हेंबर रोजी केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चव्हाण यांचे हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. यावेळी नागपुरात ७० कोटींचे संत्रा क्लीन प्लांट सेंटर सुरू करण्यात येईल अशी घोषणा शिवराज सिंह चव्हाण यांनी केली. चांगल्या नर्सरींचा शोध घेत मोठ्या नर्सरींना चार कोटींपर्यंत तर मध्यम नर्सरींना दोन कोटींपर्यंत अर्थसहाय्य करण्याची घोषणाही त्यांनी केली. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, कृषी राज्यमंत्री आशीष जयस्वाल, सहकार राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, माजी मंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्यासह विविध कृषी विद्यापीठांचे कुलगुरू आणि मान्यवर मोठ्या संख्येत उपस्थित होते. यावेळी पशुखाद्य प्रकल्पाचे ऑनलाईन उद्घाटन देखील शिवराजसिंह चव्हाण यांचे हस्ते करण्यात आले.यंदाचे ॲग्रो व्हिजन अत्याधुनिक तंत्रज्ञानाने परिपूर्ण असल्याचे भेट देणाऱ्या शेतकऱ्यांनी मत व्यक्त केले. कृषी प्रदर्शनात ॲग्रो टुरिझम, संत्रा, लिंबू फळ रोपवाटिका, पुर्ती गॅस अंकूर सीड्स भाजीपाला उत्पादन वाढवण्यासाठी नैसर्गिक खतांचे स्टॉल्स अत्याधुनिक शेती अवजारांचे स्टॉल्स इत्यादींवर शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. नागपूर जवळच्या धापेवाडा टेक्स्टाईल उद्योगाने तयार केलेल्या सिल्क साड्यांना येथे मोठ्या प्रमाणात मागणी असल्याचे दिसून आले. संत्रा उत्पादकांच्या स्टॉलवरही मोठ्या प्रमाणात गर्दी दिसली. दुग्धोत्पादन, कृषी मालावर प्रक्रिया आणि निर्यातीला उत्तेजन देणारे स्टॉल्स येथेही शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याचे दिसून आले. ॲग्रो व्हिजन प्रदर्शनाच्या निमित्तानेच फॉडर मॅनेजमेंट न्यू टेक्नॉलॉजी ॲण्ड प्रोसेसिंग इंडस्ट्री या विषयावर परिषदेचेही आयोजन करण्यात आले होते. येथे डेअरी या विषयावरही मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी डॉ. नरेंद्र पाटील यांनी महाराष्ट्र शासन व मदर डेअरीच्या विविध योजनांबद्दल शेतकऱ्यांना माहिती दिली. यालाच जोडून राष्ट्रीय तेलबिया अभियान आणि एकात्मिक वैज्ञानिक मधमाशी पालन या विषयावरही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात देखील मान्यवर अभ्यासकांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. ॲग्रो व्हिजन प्रदर्शनाच्या निमित्ताने ॲग्रो व्हिजन फाऊंडेशन, नॅशनल ब्युरो ऑफ सोईल सर्वे ॲण्ड लॅण्ड युज प्लॅनिंग आणि बारामती ॲग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्ट यांच्यात आज विदर्भाच्या शेतकऱ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित तंत्रज्ञानाचे सुलभ मार्गदर्शन देण्यासाठी सामंजस्य करार करण्यात आला. सुरुवातीला या करारा अंतर्गत तूर, उस आणि संत्रा पिकासाठी सखोल ज्ञान प्राप्त करून त्यानंतर एकत्रित सहकार्याने शेतकऱ्यांच्या उत्पादन वाढीसाठी काम करण्यात येणार आहे. हे प्रयोग यशस्वी झाल्यावर विविध पिकांना त्यात समाविष्ट करून घेतले जाणार आहे. यावेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी बारामती ट्रस्टचे प्रताप पवार पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. शरद गडाख यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. शेतकऱ्यांना विकासाचा हट्ट धरावा लागेल असे प्रतिपादन प्रताप पवार यांनी यावेळी बोलताना केले.चार दिवस चाललेल्या या प्रदर्शनांमध्ये विविध कार्यशाळांमध्ये तज्ज्ञांनी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. येथे लाखो शेतकऱ्यांनी प्रदर्शनाला भेट दिली. आता ग्रो व्हिजन फक्त वर्षातून एकदा प्रदर्शन आयोजित करणार नाही, तर वर्षभर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणारे कार्यक्रम आयोजित करेल अशी घोषणा ॲग्रो व्हिजनचे प्रवर्तक आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केली. अमरावती मार्गावर पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या ग्राउंडवर तयार होत असलेल्या कन्वेंशन सेंटरमध्ये हे कार्यक्रम नियमितपणे होत जातील असे त्यांनी सांगितले. एकूणच हे प्रदर्शन आणि तीन दिवस झालेली तज्ज्ञांची भाषणे आणि झालेल्या कार्यशाळा यामुळे ॲग्रो व्हिजन यंदाही चर्चेचा विषय ठरले होते.

नागपूर विदर्भात चर्चेचा विषय ठरणारा दुसरा इव्हेंट म्हणजे नॅशनल बुक ट्रस्टतर्फे आयोजित नागपूर पुस्तक महोत्सव. रेशीमबाग मैदानावर झालेल्या या प्रदर्शनात तीनशे प्रकाशकांनी आपले स्टॉल्स लावले आहेत.त्यात १५ लाखांहून अधिक विविध विषयांची पुस्तके येथे विक्रीसाठी उपलब्ध राहणार आहेत, अशी माहिती नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे यांनी यावेळी दिली. या प्रदर्शनाचे उद्घाटन २२ नोव्हेंबर रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे हस्ते झाले. ज्ञानाचे भंडार वाढवण्यासाठी ग्रंथांचेच वाचन आवश्यक आहे. वाचन संस्कृती हा मनोरंजनाचा विषय नव्हे, तर ग्रंथांच्या माध्यमातून आपल्या व्यक्तिमत्त्वात बदल होतो. वाचण्याची सवय असल्यास आपले विचार बदलतात नव्या कल्पना सुचतात आपल्या समाजमनावर चांगल्या पुस्तकांचा प्रभाव पडत असतो. त्यामुळेच ज्ञानाचे भांडार वाढवण्यासाठी पुस्तके गरजेची आहेत असे प्रतिपादन नितीन गडकरी यांनी यावेळी केले. याच प्रदर्शनात झिरो माइल लिटरेचर फेस्टिवलचे देखील आयोजन करण्यात आले आहे. या फेस्टिवलचे उद्घाटन २३ नोव्हेंबर रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे हस्ते झाले. आजच्या गुगलच्या जीपीटी एआयच्या युगात माहिती ज्ञानामध्ये परिवर्तित होत नाही. तोवर ती केवळ माहिती असते. त्यामुळे माहितीकडून ज्ञानाकडे जायचे असेल आणि ज्ञानी म्हणून नावलौकिक मिळवायचा असेल, तर पुस्तकाशिवाय पर्याय नाही. तरुण पिढीपर्यंत दर्जेदार पुस्तके पोहोचवण्याची नितांत गरज असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केले. यावेळी प्रसिद्ध शिवकथाकार विजयराव देशमुख हे देखील उपस्थित होते.

# मुंबई येथे बोन्साय आणि ओरिगामी कला प्रदर्शनाला सुरुवात

दैनिक वादळ वार्ता । मुंबई । प्रतिनिधी

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, मुंबईतील जपानचे महावाणिज्यदूत कोजी यागी यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन झाले असून दिनांक २८ ते ३० नोव्हेंबर दरम्यान प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार बृहन्मुंबई महानगरपालिका, वृक्ष प्राधिकरण आणि मुंबईतील जपानचे महावाणिज्य दूतावास यांच्या संयुक्त विद्यमाने प्रथमच भरविण्यात आलेल्या बोन्साय आणि ओरिगामी कला प्रदर्शनाचे भायखळा येथील वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यान आणि प्राणिसंग्रहालयात २८ नोव्हेंबर उद्घाटन करण्यात आले



बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक . भूषण गगराणी, मुंबईतील जपानचे महावाणिज्यदूत कोजी यागी, संस्कृती आणि माहिती विषयक वाणिज्यदूत श्रीमती शिमादा मेगुमी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ पार पडला.

भारतामध्ये सन १९७२ पासून बोन्सायची पायाभरणी करणारे आणि इंडो-जपानी असोसिएशनच्या बोन्साय स्टडी ग्रुपचे संस्थापक . निकुंज पारिख, सौ. ज्योती पारिख, . राजीव वैद्य, श्रीमती सुजाता भट, श्रीमती गीता कांतावाला यांच्यासह महानगरपालिकेचे उद्यान अधीक्षक . जितेंद्र परदेशी, संचालक (प्राणिसंग्रहालय) डॉ. संजय त्रिपाठी आदी मान्यवर उपस्थित होते. २८ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर या कालावधीत सकाळी १० ते सायंकाळी ६ या वेळेत हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले राहणार आहे.

मुंबईतील जपानचे महावाणिज्यदूत . कोजी यागी यांनी 'नमस्ते मुंबई' म्हणत सादर केलेल्या मराठीतील छोटेखानी मनोगताने उपस्थितांची मने जिंकली. . यागी म्हणाले, की भारतातील मुंबई आणि जपानमधील योकोहामा ही दोन्ही शहरे सन १९६५ मध्ये भगिनी शहर संबंध (सिस्टर सिटी) या उपक्रम अंतर्गत जोडली गेली. या उपक्रमाला आता ६० वर्षे पूर्ण होत आहेत. त्याअनुषंगाने या प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईकरांनी या 'इको फ्रेण्डली' प्रदर्शनास आवश्य भेट द्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.

बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक . भूषण गगराणी म्हणाले, जपान आणि भारताचे मैत्रीपूर्ण संबंध आहेत. भगिनी शहर संबंध (सिस्टर सिटी) या उपक्रमाला सहा दशके झाली आहेत. वीरमाता जिजाबाई भोसले वनस्पती उद्यानात भरविण्यात आलेल्या बोन्साय आणि ओरिगामी प्रदर्शनातून निसर्ग सौंदर्य आणि मानवी कलेले अविष्कार मांडण्यात आले आहेत. सतत धावपळीत असणाऱ्या मुंबईकरांनी या प्रदर्शनाला भेट द्यावी, असे . गगराणी म्हणाले.

बोन्साय प्रदर्शनात तारामणी, निलगिरी, बोधी वृक्ष, निर्गुडी, चायनीज लिंबू, चायनीज वड, नागचंपा, गुग्गुळ आदींचे लहान आकारातील रुप मांडण्यात आले आहे. तसेच ओरिगामी प्रदर्शनात विविध प्राण्यांची, पक्षी, फुलांची, अवजारांची कलाकृती साकारण्यात आली आहे. यासह अनेक विलोभनीय आणि थक्क करणाऱ्या कलाकृती केवळ कागदाचा वापर करुन साकारण्यात आल्या आहेत. यासाठी ओरिगामी मित्रा यांचे सहकार्य लाभले आहे. हे प्रदर्शन विनामूल्य आहे, अशी माहिती उद्यान अधीक्षक . जितेंद्र परदेशी यांनी दिली. या प्रदर्शनासाठी बोन्साय स्टडी ग्रुप ऑफ द इंडो-जॅपनिज असोसिएशन व ओरिगामी मित्र यांचे सहकार्य लाभले आहे. उद्घाटन समारंभानंतर अनेक अभ्यासक, विद्यार्थी, युवकांसह मुंबईकरांनी या प्रदर्शनाला भेट दिली.

# बटरपासून ते ज्यूसपर्यंत या गोष्टी कधीही फ्रिजमध्ये का ठेवू नयेत? ९०% लोक त्याच चुका करतात

दैनिक वादळ वार्ता । वृत्तसेवा





आजकाल जवळजवळ सर्व घरांमध्ये फ्रिज असतोच असतो. हिवाळा असो वा उन्हाळा, फ्रिजचा वापर अगदी दररोज केला जातोच. फ्रिजमध्ये खराब होऊ नये म्हणून अन्नपदार्थ, फळे, ज्यूस अगदी मसाले देखील काहीजण ठेवतात. फ्रिजमुळे अगदी कोणतेही खाद्यपदार्थ फ्रिजमध्ये ठेवण्याची सवय झाली आहे. पण हे बऱ्याच जणांना हे माहित नाही की सगळेच पदार्थ फ्रिजमध्ये ठेवायचे नसतात. कारण काही पदार्थ फ्रिजमध्ये ठेवणे योग्य नाही. अन्यथा त्यामुळे ते पदार्थ तर खराब होतीलच पण त्यांच्या सेवनाने आपल्यालाही त्रास होऊ शकतो. जाणून घेऊया असे कोणते अन्नपदार्थ आहेत जे फ्रिजमध्ये ठेवल्यास विषात बदलू शकतात.दूध आणि दह्यापासून ते कच्च्या आणि शिजवलेल्या भाज्यांपर्यंत, आपण बहुतेक अन्नपदार्थ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवतो. काही लोक कुकीज, चॉकलेट आणि फळे देखील रेफ्रिजरेटरमध्ये ठेवतात. परंतु सर्व पदार्थ रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नये. काही वस्तू अशा आहेत ज्या रेफ्रिजरेटरमध्ये ठेवल्यास खराब होऊ शकतात.

**ज्यूस**

कोणत्याही फळांचे ज्यूस खूप कधीही फ्रिजमध्ये ठेवू नयेत. मुख्य म्हणजे फळांचा ज्यूस हा ताजा काढूनच पिणे योग्य आहे. पण फळांचा ज्यूस बनवून तसाच कित्येक दिवस फ्रिजमध्ये ठेवल्याने तो खराब होतो आणि असा ज्यूस प्यायल्याने आपल्याला फूड पॉयझनसारखा त्रास होऊ शकतो.

**कच्चे मांस**

जर तुम्ही कच्चे मांस रेफ्रिजरेटरमध्ये ठेवत असाल तर लक्षात ठेवा की त्याला खूप थंड तापमानाची आवश्यकता असते. ते फार दिवस फ्रिजमध्ये ठेवू नये. त्यामुळे मांस खराब होऊ शकते. ज्यामुळे बॅक्टेरिया आणि अन्न विषबाधा होण्याचा धोका अनेक पटींनी वाढू शकतो.

**केळी**

केळी कधीही रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नयेत. त्यामुळे त्या लवकर काळी पडतात तसेच त्याची चव खराब होऊ शकते.

**दही**

जर तुम्ही दही रेफ्रिजरेटरमध्ये ठेवत असाल तर तापमानातील बदलामुळे त्याची पोत बदलू शकते किंवा ते लवकर आंबट होऊ शकते. म्हणून, दही देखील रेफ्रिजरेटरमध्ये ठेवू नये.

**दूध**


हा अत्यंत नाशवंत पदार्थ आहे. जर तुम्ही दूध रेफ्रिजरेटरच्या ड्रॉवरमध्ये ठेवले तर ते उघडल्याने ते गरम हवेच्या संपर्कात येते, ज्यामुळे ते लवकर खराब होऊ शकते.

**बटर**

बहुतेक घरांमध्ये, बटर रेफ्रिजरेटरच्या दारात किंवा फ्रिजमध्ये ठेवल्याने ते लवकर खराब होते. तसेच ते सतत ठेवल्याने ते गोठते त्यामुळे त्याची पोत आणि चवही बदलते.

# शरिरावर टॅटू काढल्यामुळे खरच स्किन कॅन्सर होतो?

दैनिक वादळ वार्ता । वृत्तसेवा




टॅटू काढण्याची फॅशन आजकाल जोरात सुरू आहे, अनेक जण आपल्या हातावर किंवा शरीराच्या इतर भागांवर वेगवेगळ्या डिझाइनचे सुंदर असे टॅटू काढतात. टॅटूमुळे शरीर आकर्षक दिसतं, सर्वसामान्यपणे शरीरावर टॅटू काढल्यामुळे कोणतंही नुकसान होत नाही. मात्र असं देखील म्हटलं जातं की अशा प्रकारचे टॅटू काढल्यामुळे काही प्रमाणात एचआयव्हीचा धोका देखील असतो. मात्र आता एका संशोधनातून हादरवणारी माहिती समोर आली आहे. स्वीडन विद्यापीठाच्या संशोधनातून असं समोर आलं आहे की, शरीरावर टॅटू काढल्यामुळे कॅन्सरचा देखील धोका वाढतो. संशोधनातून असं समोर आलं आहे की, जे आपल्या शरीरावर टॅटू काढतात त्यांना मेलानोमा (एक प्रकारचा स्किन कॅन्सर) चा धोका इतर लोकांच्या तुलनेत अधिक असतो. या संशोधनामध्ये २० ते ६० वयोगटातील सुमारे २,८८० लोकांना सहभागी करून घेण्यात आलं होतं, ज्यांना मेलानोमा नावाचा कॅन्सर झाला होता. या रिसर्चमधून असं समोर आलं आहे की, शरीरावर टॅटू काढताना ज्यांचं वय हे दहा वर्षांपेक्षा अधिक आहे, अशा लोकांना या कॅन्सरचा धोका तुलनेनं जास्त आहे.

रिसर्चमध्ये असं समोर आलं की, टॅटू बनवण्यासाठी जी इंक वापरली जाते, ती इंक जेव्हा आपल्या त्वचेमध्ये इंजेक्ट केली जाते, तेव्हा आपलं शरीर या इंकला शरिराबाहेरील हानिकारक तत्व मानतं, आपल्या शरीरावर कोणी तरी हल्ला केला आहे, असं वाटल्यामुळे शरीराची इम्यून सिस्टम सक्रिय होते. त्यामुळे होत काय की ही इंक रोगप्रतिकारक पेशींनी वेढली जाते. मात्र ही इंक पेशींपर्यंत पोहोचते. टॅटू बनवण्यासाठी जी इंक वापरी जाते, त्यामध्ये अशी काही द्रव्य असतात जी पुढे चालून कॅन्सरसारख्या रोगाला कारणीभूत ठरतात. जर तुमच्या शरीराचा टॅटू काढलेला भाग जास्त काळ सतत सूर्याच्या संपर्कात राहिला तर तुम्हाला कॅन्सरचा धोका इतरांच्या तुलनेनं अधिक वाढतो, असं हे रिसर्च सांगतं.मात्र जरी धोका वाढत असला तरी देखील या रिसर्चमधून ठोस असा निष्कर्ष काढण्यात आलेला नाहीये की, टॅटूमुळे कॅन्सर होतोच म्हणून, फक्त त्यामध्ये असं म्हटलं आहे की, टॅटू काढणाऱ्यांमध्ये टॅटू न काढण्याऱ्यांपेक्षा कॅन्सरचा धोका अधिक असतो. टॅटू आणि कॅन्सरचा थेट संबंध या संशोधनात कुठेही आढळून आलेला नाहीये. त्यामुळे आपला टॅटू असलेला शरिराचा भाग हा थेट सूर्य प्रकाशात वारंवार आणि जास्त काळ येणार नाही, याची काळजी घ्यावी, असं हे संशोधन सांगतं.

# राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

दैनिक वादळ वार्ता
अहिल्यानगर । प्रतिनिधी

जय युवा अकॅडमी व जय असोसिएशन ऑफ एनजीओ महाराष्ट्र राज्याच्या वतीने शहरात आयोजित करण्यात आलेल्या नऊव्या राज्यस्तरीय सावित्री ज्योती महोत्सवामध्ये समाजातील विविध क्षेत्रात निस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या व्यक्तींना राज्यस्तरीय सावित्री ज्योती गौरव २०२६ पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. या पुरस्कारासाठी सामाजिक, शैक्षणिक, पर्यावरण, सांस्कृतिक, कला, क्रीडा, साहित्य, उद्योजक, कृषी, आरोग्य, धार्मिक, विधी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



समाजात विविध क्षेत्रात निस्वार्थ भावनेने कार्य करणारे व प्रसिध्दी झोतापासून लांब असलेल्या व्यक्तींचे समाजकार्य समाजापुढे घेऊन जाऊन त्यांच्या कार्याचा सन्मान होण्यासाठी सावित्री ज्योती गौरव पुरस्कार दिले जाणार आहेत. १८ जानेवारी रोजी गुलमोहर रोड येथील कोहिनूर मंगल कार्यालयात होणाऱ्या राज्यस्तरीय सावित्री ज्योती महोत्सवात या पुरस्काराचे वितरण होणार आहे. सेमी पैठणी साडी, स्मृतीचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. इच्छुक व्यक्तींनी दोन पासपोर्ट फोटोसह आपल्या कार्याचा परिचय थोडक्यात ॲड. महेश शिंदे, पावन गणपती मंदिरा शेजारी, जुन्या कोर्टाच्या पाठीमागे टांगे गल्ली, अहमदनगर या पत्त्यावर २० डिसेंबर पर्यंत प्रस्ताव पाठवण्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. सावित्री ज्योती महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी गौरव समितीचे अध्यक्ष ॲड.प्रशांत साळुंके (पुणे), समिती सदस्य ॲड. दिनेश शिंदे, ॲड.पोपट बनकर, डॉ. इसाभाई शेख, ॲड. आरती शिंदे, प्रा. हर्षल आगळे, तुषार रनन्नवरे, विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड, भाऊसाहेब पादीर, विनोद साळवे, शिवाजी नवले, प्रा. सुनील मतकर, मेजर भीमराव उल्हारे, दिनेश शिंदे, सलीम सय्यद, रावसाहेब मगर, इसाभाई शेख, डॉ. अमोल बागुल, बाळासाहेब पाटोळे, रावसाहेब काळे, आदी प्रयत्नशील आहेत. अधिक माहितीसाठी ९९२१८१००९६ या नंबरवर संपर्क साधण्याचे म्हंटले आहे.

# पैशांचा वापर करून निवडणुका खरेदी करायच्या; हा भाजपचा खरा फॉर्म्युला

## नीलेश राणेंच्या आरोपानंतर रोहित पवार यांचीही टीका

दैनिक वादळ वार्ता

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मालवण नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि विरोधकांमध्ये राजकीय संघर्ष तीव्र झाला आहे. मालवणमधील भाजप कार्यकर्त्याच्या २५ लाखांची रोकड सापडल्याप्रकरणी भाजपवर थेट पैशांच्या जोरावर निवडणूक जिंकण्याचा आरोप होत असताना आता राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी या प्रकरणावरून भाजपवर घणाघाती हल्ला चढवला आहे. सत्तेचे सर्व सुख भोगायचे आणि त्याच पैशांचा वापर करून निवडणुका खरेदी करायच्या, हा भाजपचा विजयाचा खरा फॉर्म्युला आहे, असा आरोप करत त्यांनी भाजपचा पार्टी विथ डिफरन्स, हा दावा खोटा असल्याचे स्पष्ट केले.

मालवणमधील नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण पुन्हा एकदा तापले आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या दौऱ्यानंतर मालवणमधील भाजप कार्यकर्त्याच्या घरी २५ लाख रुपयांची रोकड आढळल्याने मोठा खळबळ उडाली आहे. यावरून शिवसेना शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे यांनी थेट भाजप आणि रवींद्र चव्हाण यांच्यावर गंभीर आरोप लावले. या आरोपाची चर्चा शांत होण्याआधीच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी भाजपला चांगलेच धारेवर धरत राणेंचे समर्थन केले आणि त्यामुळे राजकीय वातावरण आणखी पेटले आहे.नीलेश राणे यांनी केलेल्या आरोपांनुसार, मालवणमधील विजय किंजवडेकर या भाजप कार्यकर्त्यांच्या घरी २५ लाखांची रोकड ठेवण्यात आली होती आणि या पैशांचा उपयोग मतदारांना पैसे वाटपासाठी होणार होता. राणे यांनी असा दावा केला की, भाजप निवडणुकीत पैसा खर्च करून विजय मिळवण्याचा प्रयत्न करत आहे. तसेच अशा पद्धतीने निवडणूक प्रक्रिया डागाळली जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. रवींद्र चव्हाण ज्या ज्या जिल्ह्यात येतात, तेथे पैसे वाटपाचे वातावरण तयार होते, असा आरोपही राणेंनी केला.या प्रकरणावर बोलताना राणेंनी आणखी धक्कादायक खुलासे केले. त्यांच्या मते, मालवणमध्ये किमान आठ ते दहा घरांमध्ये पैशांच्या बॅगा ठेवल्या आहेत आणि रोज खास यंत्रणेमार्फत त्या बॅगा कार्यकर्त्यांकडे पोहोचवल्या जातात. पप्पा तवटे, मोहन सावंत, रणजीत देसाई आणि रुपेश कानडे हे कार्यकर्ते पैसे वाटण्याचे काम करतात, असा आरोप राणेंनी केला. भाजप सत्तेत आली तर विकास नव्हे, तर लोकसत्तेची लूट करण्यासाठीच नगरपरिषदेवर कब्जा करण्याची योजना असल्याचा दावा त्यांनी केला. त्यांनी निवडणूक आयोग आणि पोलिसांकडे या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणीही केली आहे.या सर्व आरोपांनंतर राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार मैदानात उतरले आहेत. त्यांनी थेट भाजपला इशारा देत म्हटले की, निवडणुका जिंकण्यासाठी पैसाच हा भाजपचा खरा फॉर्म्युला आहे. यात कुठलीच चाणक्यनीती नाही. तसेच शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यानेच भाजपचे पाप उघड केले, यासाठी त्यांनी राणेंचे आभार मानले. पार्टी विथ डिफरन्स, म्हणून ज्या पक्षाचा डंका वाजवला जातो, त्या पक्षाचा चेहरा कोणता आहे, हे आता जनतेसमोर आले, असे रोहित पवारांनी तिखट शब्दांत म्हटले आहे. त्यांच्या विधानामुळे महायुतीत अंतर्गत संघर्षांचं चित्र अधिक स्पष्ट झालं आहे.या प्रकरणामुळे मालवणमधीलच नव्हे तर राज्यभरातील राजकीय वातावरण अधिक तापले आहे. भाजप, शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गट यांच्यातील संघर्ष आता उघडपणे समोर आला आहे. निवडणुकीचा काळ असल्याने हे आरोप–प्रत्यारोप आणखी तीव्र होतील, अशी शक्यता व्यक्त होत आहे. निवडणूक आयोग या गंभीर प्रकरणाची चौकशी कशी करतो, भाजप यावर कोणती प्रतिक्रिया देते आणि राणे–पवार यांचे आणखी खुलासे बाहेर येतात का, याकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.



## श्रीदत्त व आनंदेश्वर महादेव प्राणप्रतिष्ठा' सोहळ्यानिमित्त रेल्वे स्टेशनला भक्तीमय वातावरणात रंगली मिरवणुक

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

अहिल्यानगर शहरातील रेल्वे स्टेशन रोडवरील आनंदनगर परिसरात दत्त कॉलनी येथील दत्त मंदिराच्या जिर्णोद्धारानिमित्त 'श्रीदत्त व आनंदेश्वर महादेव प्राणप्रतिष्ठा' या धार्मिक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर परिसरातील नागरिकांनी मोठ्या उत्साहात भक्तीमय वातावरणात मिरवणुक काढली.



हा सोहळा दत्त कॉलनी, आनंदनगर परिसरातील रहिवासी तसेच मित्रपरिवाराच्या सहकार्याने तीन दिवस भक्तिभावात संपन्न होत आहे. शुक्रवारी संध्याकाळी श्रीदत्त मूर्तीची दिव्य मिरवणूक रेल्वे स्टेशन परिसरात रंगली होती. या मिरवणुकीत पारंपरिक पद्धतीने सजवलेल्या बैलगाडीत श्रीची मूर्ती विराजमान करण्यात आली होती.

भक्तिगीतांच्या तालावर युवकांचा उत्साह ओसंडून वाहत होता. महिलांनी पारंपरिक पोशाखात फुगड्यांचा फेर धरला होता. मिरवणुकीभोवती मांडलेल्या छत्रींवर आकर्षक विद्युत रोषणाई सर्वांचे लक्ष वेधणारी ठरली. ढोल–ताशांच्या निनादाने संपूर्ण परिसर भक्तिमय बनला होता.

या मिरवणुकीत महिला व युवती तुलसी वृंदावन डोक्यावर घेऊन सहभागी झाल्या. तुलसी वृंदावनाची ही परंपरा भगवान दत्तात्रेयांच्या भक्तीतून रुजलेली असून, त्याला विशेष धार्मिक महत्व आहे. त्यामुळे मिरवणुकीला एक आध्यात्मिक रूप लाभले. मिरवणुकीत घोड्यावर आरूढ घोडेस्वारांनी भगवे ध्वज फडकवत दिमाखदार उपस्थिती दाखवली.

भक्तीमय वातावरणाने भारावलेली मिरवणुक पाहण्यासाठी नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी केली होती. संपूर्ण रेल्वे स्टेशन रोड परिसरात उत्साह संचारला होता. यामध्ये भाविक महिला, मुले–मुली मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या धार्मिक सोहळ्यानिमित्त शनिवार व रविवारी प्राणप्रतिष्ठा विधी, महापूजा, कीर्तन–प्रवचन, महाप्रसाद यासह विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यामुळे आनंदनगर परिसरात उत्साह व भक्ती संचारली आहे.

## गांधी मैदानातील श्री मार्कंडेय विद्यालयात विविध स्पर्धेतून संविधानाचा जागर

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

पद्मशाली विद्या प्रसारक मंडळ संचालित श्री मार्कंडेय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संविधान दिन उत्साहात साजरा करण्यात आला. संविधान दिनानिमित्त शाळेत विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. तसेच विद्यार्थ्यांनी काढलेल्या संविधान जागर रॅलीने परिसरातील नागरिकांचे लक्ष वेधले.

संविधान दिनाचे औचित्य साधून विद्यालयात चित्रकला व पोस्टर मेकिंग स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा, गीतगायन स्पर्धा उत्साहात पार पडली. या सर्व स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवला आणि स्पर्धा अत्यंत यशस्वीरीत्या पार पडल्या. विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य, न्याय, समता, बंधुता, भारतीय संविधान आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे समर्पक दर्शन त्यांच्या कलाकृतीतून घडवले. विद्यार्थ्यांनी हातात संविधानाशी संबंधित घोषवाक्य असलेले लहान आकर्षक फलक घेतले होते. संविधान आमचा अभिमान, अधिकारांसोबत कर्तव्यही पाळूया,



लोकशाहीचा सन्मान करूया अशा घोषणांनी परिसर दुमदुमला. रॅली शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात आली, तर विद्यार्थ्यांनी संविधानाचा जागर केला.

पद्मशाली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष तसेच भारतीय जनसंसदेचे अशोक सब्बन यांनी संविधानाची उद्दिष्टे, रचना, महत्त्व आणि नागरिक म्हणून विद्यार्थ्यांची जबाबदारी याविषयी सोप्या भाषेत मार्गदर्शन केले व संविधानाची पार्श्वभूमी विद्यार्थ्यांना समजावली. भारतीय संविधान हे जगातील सर्वात मोठे आणि सक्षम संविधान असून विद्यार्थ्यांनी त्यातील मूल्ये अंगीकारणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

विद्यालयातील शिक्षिका रेणुका खरदास मॅडम यांनी संविधान तयार होण्याची पार्श्वभूमी, मसुदा समितीचे कार्य, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान आणि नागरिकांना मिळणारे अधिकार व कर्तव्ये याची सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना दिली.

या कार्यक्रमाप्रसंगी मुख्याध्यापक संदिप छिंदम, उपमुख्याध्यापक पांडुरंग गोने, पर्यवेक्षक प्रमोद चन्ना, शिक्षक प्रतिनिधी अर्चना साळुंके, शिक्षकेतर प्रतिनिधी सुहास बोडके, कविता गुडेवार, कल्याणी म्याना, जनाबाई कराळे, मनीषा राठोड, पवन गालपेल्ली, उत्तम लांडगे, तानाजी काळूगे, सेवक मथुरा आढाव, अजय न्यालपेल्ली, निलेश आनंदास आदी मान्यवर उपस्थित होते

## अपघात टाळण्यासाठी अखेर आनंदधाम ते अहिंसा चौक दरम्यान बसविण्यात आले गतीरोधक



दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

आनंदधाम परिसर ते अहिंसा चौक या महत्त्वाच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण झाल्यानंतर गेल्या काही महिन्यांपासून लहान–मोठ्या अपघातांची मालिका सुरू झाली होती. पादचारी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला असताना माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी पुढाकार घेत रस्त्यावर गतीरोधक बसवून देण्याचा प्रश्न मार्गी लावला. या कामामुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न सोडविल्याबद्दल स्थानिकांनी घुले यांचा सत्कार केला.

या प्रसंगी अमोल पोखरणा, संजय कटारिया, दिलीप बोरा, पंकज गांधी, रितेश चोपडा, संचिन डुंगरवाल, सिद्धेश फुलसौंदर, प्रशांत फुलसौंदर, दिलीप कटारिया, प्रकाश गुंदेचा, निलेश मेहेर, संजय भंडारी, जितू पोरवाल, रितेश कोठारी, दिप पोखरणा आदी नागरिक उपस्थित होते.आनंदधाम परिसर ते अहिंसा चौक रस्ता सिमेंट काँक्रीटीकरण झाल्याने त्यावरून वाहने प्रचंड वेगाने धावत होती. आनंदधाम आणि उज्वल नगर येथे जैन समाजाची दोन महत्त्वाची धार्मिक स्थळे आहेत. येथे साधू–साध्वी दररोज सकाळ–संध्याकाळ पायी मार्गक्रमण करतात. भरधाव वेगाने धावणाऱ्या वाहनांमुळे या साधू–साध्वींबरोबरच रोज फेरफटका मारणाऱ्या नागरिकांनाही वाढत्या अपघातांचा धोका निर्माण झाला होता. रस्ता ओलांडणे तर अनेकांसाठी धोकादायक बनले होते.गेल्या काही महिन्यांत झालेल्या अपघातांत अनेक ज्येष्ठ नागरिक जखमी झाले असून काहींना वेगाने येणाऱ्या वाहनांनी उडवल्याच्या घटना घडल्या. अशा परिस्थितीमध्ये नागरिकांकडून या रस्त्यावर तातडीने गतीरोधक बसविण्याची मागणी करण्यात आली होती. या संदर्भात माजी नगरसेवक अविनाश घुले यांनी पाठपुरावा करुन रस्त्यावर गती रोधक बसवून दिले. नागरिकांच्या प्रश्नाची दखल घेतल्याबद्दल नागरिकांच्या वतीने घुले यांचे आभार मानण्यात आले.

## महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात बाल आनंद मेळावा उत्साहात

दैनिक वादळ वार्ता
**अहिल्यानगर | प्रतिनिधी**

केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात दरवर्षीप्रमाणे आयोजित करण्यात आलेल्या 'बाल आनंद मेळावा' या उपक्रमास यंदा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. डिजिटल व्यवहारावर आधारित असलेल्या या मेळाव्यात विद्यार्थिनींनी लावलेल्या विविध खाद्यपदार्थ व वस्तूंच्या स्टॉलद्वारे तब्बल पंचेचाळीस हजार रुपयांची उलाढाल झाली. डिजिटल व्यवहाराच्या प्रायोगिक शिक्षणाचा हा उत्तम अनुभव ठरला.



विद्यार्थिनींचे हातून डिजिटल मार्केटचे यशस्वी नियोजन करण्यात आले होते. पाणीपुरी, पापडभाजी, वडापाव, भेळ, समोसा, मसाला ताक, ढोकळा, चकली, इडली–चटणी, लस्सी, गुलाबशरबत, फ्रुट स्टॉल, पॅटीस, चीज सॅण्डविच, पावभाजी, नुडल्स, मेदुवडा, आप्पे, हरभरा उसळ चाट, रसना, ज्वारीची खिचडी, गुलाबजाम तसेच शालेय परसबागेतील भाजीपाला आणि विविध खेळणी असे जवळपास ३० पेक्षा अधिक स्टॉल विद्यार्थिनी व पालकांनी उभारले होते.

मेळाव्यातील सर्व व्यवहार शिक्षकांच्या गुगल पे आणि फोन पेद्वारे डिजिटल पद्धतीने पूर्ण करण्यात आले. यामुळे विद्यार्थिनींना नाणीनोटा ओळख, खरेदी–विक्री, नफा–तोटा, आकडेमोड, डिजिटल पेमेंट प्रक्रिया यांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव बबनराव कोतकर होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक दौलतराव शिंदे उपस्थित होते. संस्थेचे संचालक जयद्रथ खाकाळ, खजिनदार प्रल्हाद साठे, सहसचिव रावसाहेब सातपुते, सोनवणे राजेश, संजय निक्रड तसेच मुख्याध्यापीका वासंती धुमाळ व सर्व शिक्षककर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उद्योजक दौलतराव शिंदे म्हणाले की, हे डिजिटल युग आहे. विद्यार्थिनींनी ह्या मेळाव्यात डिजिटल व्यवहार शिकणे ही काळाची गरज आहे. या उपक्रमातून विद्यार्थिनींना लहान वयातच व्यावहारिक कौशल्ये आणि व्यावसायिक दृष्टिकोन मिळतो. शाळेतील सातत्याने चालणारे नवनवीन उपक्रम पाहता या कन्या विद्यालयाची राज्यात नोंद होण्यासारखे असल्याचे त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय मनोगतात बबनराव कोतकर म्हणाले की, आज विद्यार्थिनींचा आनंदाचा दिवस आहे, पण अभ्यासाकडे दुर्लक्ष न करता अशा उपक्रमांतून स्व–घडणीकडे वाटचाल करण्याचे स्पष्ट केले.

मुख्याध्यापीका वासंती धुमाळ यांनी विद्यार्थिनींना व्यावहारिक ज्ञान मिळावे, आकडेमोड सहज जमावी आणि डिजिटल व्यवहारांचे कौशल्य विकसित व्हावे म्हणून दरवर्षी हा बाल आनंद मेळावा आयोजित केला जात असल्याची माहिती दिली. प्रास्ताविक छाया सुबे यांनी केले. सूत्रसंचालन भारती गुंड यांनी केले. आभार जयश्री कोतकर यांनी मानले.

### लायन्स हेल्थ फाऊंडेशन आणि ग्रामपंचायत निलज यांच्या संयुक्त विद्यमाने

## मुख्य मंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत मोफत नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**बोरघर / माणगाव | प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ माणगाव, लायन्स हेल्थ फाउंडेशन आणि ग्रामपंचायत निलज यांचे संयुन्त विद्यमाने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत ग्रामपंचायत कार्यालय निलज येथे शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर रोजी मोफत नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात आले होते.सदर शिबिरात रुग्णांची मोफत नेत्र तपासणी करण्यात आली तसेच मोतीबिंदू रुग्णांची मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येतील. या कार्यक्रमासाठी ,लायन्स क्लब ऑफ माणगाव चे अध्यक्ष संदीप नागे, क्लब, मेम्बरशिप चेअर पर्सन लायन सुरेशजी मोहिते, डायरेक्टर संतोष नागे, विशाल जाधव, कृषी अधिकारी लायन्स हेल्थ फाउंडेशन चे निलेशजी म्हात्रे, तेरणा हॉस्पिटल चे राम महाडिक, प्राथमिक आरोग्य केंद्र इंदापूर येथील आरोग्य सेवक सुधीर खैरे, यांनी सदरील शिबिरामध्ये अनमोल योगदान दिले.सी. एन. मोरे आरोग्य सेविका प्राथमिक शिक्षक, अंगणवाडी ताई तसेच ग्रामपंचायत निलज विभागातील ग्रामस्थ आणी रुग्ण मोठया संख्येने उपस्थित होते. या कार्यक्रमाचे व्यवस्थापक ग्रामपंचायत निलज सीमा काकडे प्रशासक आणि सारिका सायगावकर, ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत निलज अशोक सोंडकर यांनी चहा, नास्ता, जेवण दिले.



# आनंदगांव येथे खंडोबा यात्रेनिमित्त केज तालुका स्तरीय भव्य पशूप्रदर्शन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

पशूसंवर्धन विभाग जिल्हा परिषद,बीड,पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती, केज,खंडोबायात्रा समिती ग्रामपंचायत आणि आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता.केज जि. बीड यांचे संयुक्त विद्येमाने दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी शनिवारी खंडोबा यात्रेनिमित्त केज तालुकास्तरीय भव्य पशू प्रदर्शन व वंध्यत्वतपासणी शिबीर व पशुपालक मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.सकाळी ९ ते १० या वेळात वंध्यत्व तपासणी शिबीर व इतर शस्त्रक्रिया करण्यात आल्या.१० ते ०१ पर्यंत भव्य पशू प्रदर्शन घेण्यात आले.चार वेगवेगळ्या गटात पुरस्कारांसाठी पशूंची निवड समितीने निवड केली.निवड समिती त पशूसंवर्धन सहआयुक्त डॉ.डि.टी.मसने,सह आयुक्त डॉ.सुदर्शन मुंडे, डॉ.देशपांडे,डॉ.देशमुख, डॉ.ठाकूर,डॉ.सातपुते यांनी काम पाहिले. अतिशय पारदर्शकपणे प्रथम,द्वितीय,तृतीय अशी वेगवेगळया गटात पशुंची निवड करण्यात आली. सकाळ पासूनच पशू वैद्यकीय अधिकारी डॉ. थळकरी अप्पा व त्यांच्या टीमने परिश्रम घेतले.



त्यानंतर ०१ ते ० ४ पर्यंत पशुपालक मेळावा व बक्षीस वितरण कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीड जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. आर.डी.कदम हे होते. प्रमुखपाहुणे व मार्गदर्शक म्हणून डॉ.देशपांडे, डॉ.मसने,डॉ.मुंडे,डॉ. मोहळकर,डॉ.थळकरी, डॉ.सातपुते,डॉ.ठाकूर, आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण,आनंदगांव ता. केज जि. बीड चे संस्थापक कार्यवाह प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड,गोविंद गायकवाड,अशोक भोगजकर यांनी मागदर्शन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.थळकरी यांनी केले,सुत्रसंचलन डॉ. मसने यांनी केले. अध्यक्षीय समारोप जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. आर.डी.कदम यांनी केला वेगवेगळया गटात प्रथम, द्वितीय,तृतीय क्रमांकाने निवड झालेल्या पशूंचे बक्षीस प्रथम - ५००० रु, द्वितीय ३००० रुपये, तृतीय २००० रुपये या प्रमाणे वेगवेगळ्या गटात प्रथम,द्वितीय,तृतीय आलेल्या पशूधनाचे बक्षीस पशुपालकांना चेकद्वारे करण्यात आले. तसेच पशुप्रदर्शनात सहभागी झालेल्या प्रत्येक पशुधनासाठी त्यात्या पशू पालकांना प्रति पशूधन नोंदणी प्रमाणे २०० रुपये प्रमाणे बक्षीस देण्यात आले.पशू प्रदर्शनातील विजेत्यांना व सहभागींना चेक,प्रमाण पत्र व पुच्छ गुच्छ देवून जिल्हा पशु संवर्धन उपायुक्त डॉ.आर. डी.कदम,आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाणचे संस्थापक कार्यवाह प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड,गोविंद गायकवाड,अशोक भोगजकर,डॉ.देशपांडे, डॉ.डी.टी.मसने,डॉ. सुदर्शन मुंडे,डॉ.थळकरी अप्पा यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

सकाळ पासून कार्यक्रम संपेपर्यंत डॉ.ताराचंद गायकवाड,ग्रामपंचायतचे विठ्ठल गावरस्कर,गोविंद गायकवाड,खंडोबा यात्रा समिती,पशुधन पर्यवेक्षक, पशूसंवर्धन विभागाचे सर्व कर्मचारी,आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण चे प्रतिनिधी व ग्रामस्थ यांनी सहकार्य केले.केज तालुक्यातून पशूपालक आपल्या पशुधनासह शेकडोंच्या संख्येने उत्स्फुर्तपणे सहभागी झाले होते.शेवटी आभार प्रदर्शन आनंद ग्रामीण विकास प्रतिष्ठाण, आनंदगांव ता.केज जि. बीडचे संस्थापक कार्यवाह प्राचार्य डॉ.वसुदेव बप्पा गायकवाड यांनी सर्व उपस्थितीतांचे,सहभागींचे,जिल्हा परिषद,पंचायत सामिती पशुसंवर्धन विभागातील सर्व अधिकारी,कर्मचारी यांचेही आभार मानले.

# अनुसयाबाई सुर्यकार यांना आधार महिला समूहाच्या वतीने अभिवादन

दैनिक वादळ वार्ता
**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील मौजे सुजलेगांव आधार महिला स्वंय सहायता समुहाच्या अध्यक्षा श्रीमती कालवंश अनुसयाबाई रावसाहेब सूर्यकार यांचे २७ नोव्हेंबर रोजी आकस्मित निधन झाल्यामुळे

आज आधार महिला स्वंय सहाय्यता समूहाची बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये सर्व महिलांनी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

व नवीन अध्यक्षपदी लक्ष्मीबाई माधवराव देवाले यांची सर्वांनुमते निवड करण्यात आली या बैठकीला तालुका व्यवस्थापक इरवंत सुर्यकार,लक्ष्मीबाई देवाले, रुक्मीणबाई कदम, तुमवाड ताई,शांताबाई काळेवार, शेवंताबाई भंडारे,शेवंताबाई रामराव भंडारे,रूक्मीनबाई डुमणे, गंगुबाई जाधव, सुनिता सुर्यकार,



समूह संसाधन व्यक्ती कल्पना तांदळे सुजलेगांव


कालवश अनुसयाबाई सुर्यकार ह्या आयुष्यभर संघर्ष केला , त्या उत्तम भाजीपाला फळविक्रेते होते त्या बळावरच तिन्ही मुलांना शिक्षण देवून सन्मानाने स्वाभिमान शिकवला त्यांचे पती १० वर्षापूर्वी निधन झाल्यानंतर त्या खचल्या नव्हत्या अत्यंत पोडतिडकीने व्यवसाय सुरू केला, त्या रयत सेवाभावी संस्थेच्या संचालक म्हणूनही १२ वर्षे काम पाहिले , समाजात त्यांनी सर्वांशी आपुलकी व जिव्हाळ्याचे संबंध आयुष्यभर जपलेल्या होत्या अशा आठवणी गावातील लोकांनी भावना व्यक्त केल्या आहेत.

# नांदेड जिल्ह्यात मतदान केंद्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

दैनिक वादळ वार्ता
**नांदेड । प्रतिनिधी**

नांदेड जिल्ह्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपरिषद/नगरपंचायत निवडणूकीच्या मतदानाच्या दिवस मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी सर्व मतदान केंद्र परिसरात भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जिल्हादंडाधिकारी राहूल कर्डिले यांनी निर्गमीत केले आहेत. या नगरपरिषद/ नगरपंचायत निवडणूक मतदानाच्या दिवशी २ डिसेंबर रोजी मतदान सुरु झाल्यापासून ते मतदान संपेपर्यन्त हा आदेश अंमलात राहणार आहे.

नांदेड जिल्ह्यातील नगरपरिषद/ नगरपंचायत- बिलोली, देगलुर, धर्माबाद, हदगाव, हिमायतनगर, कंधार, कुंडलवाडी, मुदखेड, मुखेड, उमरी, भोकर, किनवट, लोहा या निवडणूकीची संपूर्ण प्रक्रिया शांततेत, निर्भय




व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोणातून कायदा व सुव्यवस्था अबाधीत राहण्यासाठी ज्या ठिकाणी मतदान होणार आहे त्या ठिकाणापासून २०० मीटर परिसरातील सर्व पक्षकारांचे मंडपे, सर्व दुकाने, मोबाईल, कॉडलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे, निवडणुकीच्या कामाव्यतीरिक्त खाजगी वाहन, संबंधीत पक्षाचे चिन्हांचे प्रदर्शन व निवडणूकीच्या कामाव्यतीरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्याकरीता मंगळवार २ डिसेंबर २०२५ रोजी प्रतिबंधीत करण्यात आले आहे.

# पारदर्शक आणि भ्रष्टाचार मुक्त राजकारणाचा वारसा असलेल्या डॉ.अंजूम कादरी यांना विजयी करा-आ.देशमुख

दैनिक वादळ वार्ता
**उदगीर । प्रतिनिधी**

उदगीर नगरपालिकेमध्ये भ्रष्टाचार मुक्त राजकारणाचे उदाहरण म्हणून ड. अब्दुल्ला कादरी यांनी उत्कृष्ट कारभार करून दाखवला होता. आजही त्यांच्या कामकाजाचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच परंपरेचा वारसा जपणाऱ्या, सामाजिक कार्यात सतत अग्रेसर राहिलेल्या उच्च विद्याविभूषित डॉ. अंजुम कादरी यांना काँग्रेस पक्षाने नगराध्यक्ष पदाची उमेदवारी दिली आहे. त्यांना उदगीरकरांनी प्रचंड बहुमताने विजयी करावे आणि उदगीर मध्ये चालू असलेल्या प्रचंड भ्रष्टाचाराला आळा घालावा, असे आवाहन माजी पालकमंत्री आ. अमित देशमुख यांनी केले. उदगीर येथील नगरपरिषद मैदानावर आयोजित नगरपालिका २०२५ निवडणूकीच्या प्रचारार्थ काँग्रेस व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आघाडीच्या वतीने विशाल जाहीर सभेस संबोधन करताना बोलत होते.

पुढे बोलताना त्यांनी स्पष्ट केले की,उदगीर शहराच्या सर्वांगीण विकासात काँग्रेस पक्षाचे महत्वपूर्ण योगदान राहिले आहे. यापुढेही विकासाची दिशा घेऊन चालणारा पक्ष म्हणून काँग्रेस पक्षच आहे, सर्वधर्मसमभाव ही अत्यंत महत्त्वाची विचारधारा जपणाऱ्या काँग्रेसच्या पाठीशी जनतेने उभा राहावे असेही आवाहन त्यांनी केले.याप्रसंगी बोलताना खा. डॉ. शिवाजी काळगे म्हणाले की, येणाऱ्या काळात माजी मंत्री आ. अमित विलासरावजी देशमुख यांच्या नेतृत्वाखालील विकास यात्रेत उदगीरकरांनी सामील व्हावे. यासाठी येत्या २ डिसेंबर रोजी काँग्रेस-शिवसेना आघाडीच्या नगराध्यक्ष पदाच्या सर्वसमावेशक, उच्चशिक्षित उमेदवार डॉ. अंजुम कादरी व सर्व नगरसेवक पदाच्या उमेदवारांना त्यांच्या नावासमोरील हाताचा पंजा आणि मशाल चिन्हासमोरील बटण दाबून प्रचंड मतांनी विजयी करावे. असे आवाहन मतदार बांधवांना केले.

या जाहीर सभेस बस्वराज पाटील नागराळकर, काँग्रेस पक्षाचे प्रदेश सरचिटणीस कल्याण पाटील, काँग्रेस चे जिल्हाध्यक्ष अभय साळूंखे, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी, उपजिल्हाप्रमुख कैलास पाटील, लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक लक्ष्मीताई भोसले, काँग्रेस पक्षाच्या महिला आघाडीच्या जिल्हा अध्यक्ष शिलाताई पाटील, तालुका काँग्रेसचे अध्यक्ष संतोष बिरादार,मारोती पांडे, उदगीर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपसभापती प्रीतीताई भोसले, रविंद्र काळे, सौ. सरोजा बिरादार, बाबुराव जाधव, विवेक जाधव, चंदन पाटील नागराळकर, ज्ञानोबा गोडभरले, ड. पद्माकर उगीले, रामेश्वर बिरादार, मंजूर पठाण, नाना ढगे,चंदू खटके, आशिष पाटील, राजीव पटवारी, माधव कांबळे आदी मान्यवर मंडळीसह काँग्रेस, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, उदगीरकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संविधानाचे संरक्षण करणे ही काळाची गरज-सज्जाद सय्यद

दैनिक वादळ वार्ता
**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकामध्ये २६ नोव्हेंबर रोजी सर्व संविधान प्रेमी एकत्र येऊन संविधान दिन साजरा करण्यात आला यावेळी सामाजिक कार्यकर्ते व संविधान प्रेमी सय्यद सज्जाद यांनी सांगितले की , माझे संविधान माझी जबाबदारी ही घोषणा वाक्य यापुढे आपण अंगीकरित केले पाहिजे, ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दोन वर्षे ११ महिने १८ दिवसांमध्ये हे संविधान आपल्याला भारताला दिले. संविधानाची संरक्षण करण्याची जबाबदारी आपण सर्वांवर आहे. संविधानाच्या अधिकारामुळेच आपल्याला सर्व अधिकार मिळाले आहे.

डॉ.नरेंद्र जावळे यांनी संविधानाची प्रत सर्वांना देऊन हे संविधान आपण सर्वांनी आपल्या घरात प्रेम करून लावावे असे आव्हान केले.

यावेळी शिवभूषण जाधव यांनी संविधानाचे वाचन केले. यावेळी उपस्थित मा. जि.प. अध्यक्ष सय्यद



अब्दुल्ला, नगराध्यक्ष राजू भैय्या जाधव नय्युम पठाण ,गणेश कवडे, नगरसेवक किशोर आडगळे, अँड. जब्बार पठाण, योगेश सानप, आनंद राऊत, सतीष गर्जे, नाईकवडे मामा, प्रमोद जावळे, सुरज जावळे,अरविंद, अमोल देवडे, व सर्व संविधान प्रेमी यावेळी उपस्थित होते. आलेल्या सर्वांचे आभार संदीप जावळे सर यांनी केले.

# शिरूरघाट पंचायतसमिती गणात सुमंत धस यांच्या जन आशीर्वाद दौऱ्याला उत्स्फूर्त प्रतिसाद! सुमंत धस साठी नागरिकांचा नारा,बदल हवा तर-चेहरा नवा

दैनिक वादळ वार्ता
**केज । प्रतिनिधी**

शिरूरघाट पंचायत समिती गणातून निवडणूकीच्या रिंगणात उतरलेले सुमंत धस यांनी गावभेट आणि जन आशीर्वाद दौऱ्याच्या माध्यमातून मुंडेवाडी, सारुळ,सारणी,केळगाव, बेलगाव,एकुरका, माळेवाडी,सांगवी येथील नागरिकांच्या भेटी घेऊन आशीर्वाद घेऊन चर्चा केली आहे.नांदूर जिल्हा परिषद सर्कल अंतर्गत येणाऱ्या शिरूरघाट पंचायत समिती गणातील नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत आणि त्यांचे आशीर्वाद घेतले तसेच नाहोली,पिट्टीघाट,धोत्रा, गदळेवाडी या गावांमध्ये गावभेट व जण आशीर्वाद दौऱ्याच्या माध्यमातून नागरिकांना भेटणार असून गावभेट व जन आशीर्वाद दौऱ्याचा समारोप शिरूरघाट येथे करण्यात येणारअसल्याचे आयोजकांनी सांगितले. सुमंत धस यांच्या जन आशीर्वाद दौऱ्याला तरुण




आणि ज्येष्ठ नागरिकांची मोठी उपस्थिती राहत आहेत,या गावभेट व जन आशीर्वाद दौऱ्यात सुमंत धस हे स्थानिक नागरिकांच्या समस्या जाणून घेत आहेत आणि त्यांच्याशी भविष्यातील विकासकामांवर चर्चा करत आहेत.गेली पंधरा वर्षे समाजकारण व राजकारणात सक्रिय असून आज पर्यंत अनेक समाज हिताची कामे केली आहेत,शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आवाज उठवणे आंदोलन करणे,कोरोना सारख्या भयंकर काळात लोकांच्या मदतीला पडणे कोरोना सेंटर चालवणे, वैयक्तिक कोणी काहीही काम सांगितले तरी त्या व्यक्तीचे काम करणे, महिलांना उद्योगाची माहिती मिळावी यासाठी महिला उद्योग मार्गदर्शन शिबिर आयोजित केले. अनेक महापुरुषांच्या जयंती साजरा केल्या या सह अनेक समाजहिताची कामे मी केली आहेत भविष्यात नागरिकांनी संधी दिली तर अजून जोमाने सामाज हिताची कामे करेल असा विश्वास सुमंत धस जण आशीर्वाद दौऱ्याच्या माध्यमातून नागरिकांना देत आहेत व नागरिकांचा देखील सकारात्मक प्रतिसाद सुमंत धस यांना आहे.

सुमंत धस यांच्या गावभेट व जनआशीर्वाद दौऱ्यात परिसरातील महत्त्वाचे सहकारी आणि मान्यवर उपस्थित आहेत यामध्ये सांगवी गावचे सरपंच श्री. संजय आण्णा केदार,उप सरपंच रामबप्पा बिक्कड, पिट्टी घाट येथील सहकारी आबासाहेब तांबडे,गुणवंत सांगळे,सुभाष बिक्कड, रमेश धस,बाळासाहेब केदार पाटील,आप्पा साहेब धस,प्रकाश केदार आदींसह अनेक तरुण व सहकारी सहभागी आहेत.

सुमंत धस यांच्या नेतृत्वा खालील या दौऱ्यामुळे शिरूरघाट पंचायतसमिती गणातील राजकीय आणि सामाजिक वातावरण अधिक सक्रिय झाले असून,सुमंत धस यांना नागरिकांचा मिळणार मोठा प्रतिसाद परिवर्तनाची नांदी आहे अशी चर्चा शिरूर पंचायत समिती गणातील गावांमध्ये सुरू आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077